मूल्य : ५ रुपये

स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

Volume : 1, Issue : 6. वर्ष : १, अंक : ६

ऑक्टोबर २०२६

## आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर
## शाश्वत गुंतवणुकीचा भक्कम पर्याय
## स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची
# दसरा-दिवाळी ठेव योजना








‘प्राथमिक कृषी सहकारी संस्थांसाठी व्यवसाय विकास योजना’ या पुण्यात झालेल्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमात स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी मार्गदर्शन केले. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या प्रायोजकत्वाने पुण्यातील आंतरराष्ट्रीय सहकार आणि कृषी बँकिंग प्रशिक्षण केंद्राने नॅफस्कॉब-मुंबई आणि वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था (वॅम्निकॉम-पुणे) यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित केला होता.





गणेशोत्सवाच्या काळात ठाणे जनता सहकारी बँकेच्या रत्नागिरी शाखेने स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांना गणेश आरतीसाठी विशेष आमंत्रित केले होते. त्या वेळी ‘टीजेएसबी’च्या शाखा व्यवस्थापक अमृता कुलकर्णी यांच्यासह बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या प्रधान कार्यालयाची नूतन इमारत रत्नागिरी शहरातील आठवडा बाजारानजीक उभी राहत आहे. या वास्तूचे बांधकाम वेगाने सुरू आहे.



सहकार विभागाचे रत्नागिरी जिल्हा उपनिबंधक राम कुलकर्णी यांनी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी त्यांचे स्वागत केले. या दोघांची विविध विषयांवर चर्चा झाली.

## संपादकीय

# नवा संकल्प, नवी उद्दिष्टे... विश्वास मात्र तोच!

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या दसरा-दिवाळी ठेव योजनेच्या प्रारंभादरम्यान 'सहकार स्वरूप'चा हा अंक आपल्या वाचनात येईल. सणासुदीच्या मंगल वातावरणात श्रद्धेने दुर्गादेवतेची पूजाअर्चा करताना सर्वत्र सुखशांती-समृद्धीची मनोकामना फलद्रूप व्हावी, यासाठी मनोमन प्रार्थना होत असणार आहे. अशा या भक्तियुक्त चैतन्यदायी वातावरणात आपला सणासुदीचा आनंद द्विगुणित करतानाच भविष्यातील आनंदाचे सर्व क्षण अधिक आनंददायी करावेत, यासाठी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आपल्या ठेवीदारांसाठी गुंतवणुकीच्या विश्वासार्ह व सुरक्षित ठेव योजना याच शुभघडीला जाहीर करते. आकर्षक व्याजदर, नियमित परतावा, विश्वासार्ह सेवा हे गुणविशेष कायम ठेवत संस्था ठेववृद्धी मास घोषित करते आणि गुंतवणूकदार सर्व स्तरांतून भरभरून प्रतिसाद देतात. त्यामुळे संस्थेची उद्दिष्टपूर्ती सहज होते. त्यातून नवीन संकल्प साकार होतात. याचा प्रत्यय गेली अनेक वर्षे पुन्हा पुन्हा घेताना मन प्रत्येक वेळी कृतज्ञतेने भरून येते. सहकारी संस्थांची भांडवलनिर्मितीची ताकद किती प्रचंड आहे, याचा प्रत्यय स्वरूपानंद पतसंस्थेची वाटचाल पाहताना येतो.

कोणी म्हणेल, दर वेळी तुमचे ठेववृद्धी मास, त्यात प्राप्त केलेल्या ठेवी यात नावीन्य काय? पण यात खूप नावीन्य आहे. कारण दर वेळी किती ठेवी जमवायच्या, किती दराने जमवायच्या, ठेवी जमल्यानंतर त्या ठेवींमधून कर्जवितरण किती वेगाने करायचे, किती रक्कम गुंतवणूक म्हणून बँकेत ठेवायची, याचे सगळे गणित दर वेळी योग्य बसवावे लागते. आणि हे गणित दर वेळी बदललेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबून असते. कारण या सर्व घटकांचा परिणाम अर्थकारणावर होत असतो. काही काळात सामाजिक कार्यक्रम, प्रामुख्याने लग्नसमारंभ मोठ्या प्रमाणावर होतात. काही वेळा सणासुदीच्या दिवसांत पैशांची गरज भासते. काही कालखंड प्रचंड पावसाचा असतो. त्यात काही काळ सर्वच मंदावलेले असते; मात्र काही काळात सोनेतारण कर्जाची मागणी वाढलेली दिसते. त्यामुळे या प्रत्येक घटकाचा विचार प्रत्येक ठेववृद्धी योजना जाहीर करताना साकल्याने करावा लागतो. नेमके उद्दिष्ट ठरवावे लागते. योग्य उद्दिष्ट नक्की केले नाही, तर पूर्वनियोजन चुकू शकते. त्यामुळे अर्थकारणात अडचणी निर्माण होऊ शकतात. आपले अर्थकारण निकोप राहावे, अर्थगती योग्य राहावी, सातत्यपूर्ण वृद्धी होत राहावी ही उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून सर्व संबंधित घटकांवर नीट लक्ष देऊन प्रामुख्याने व्यवहार वाढवताना कॉस्ट (खर्च) नियंत्रणात राहावी, हा विचार केला जातो. पैसा उभारणीवर अतिरिक्त कॉस्ट खर्च होऊ नये, ही कॉस्ट नियंत्रणात राहिली तरच कर्जाचे दर नियंत्रणात राहू शकतात. कारण कर्जदर किफायतशीर नसतील, तर त्याचा बोजा कर्जदारावर पडतो आणि मग वसुली मंदावते. तसेच, कर्जमागणीही मंदावते आणि अतिरिक्त दर देऊन हौसेने जमा केलेली ठेव रक्कम नुसती पडून राहण्याचा धोका असतो. अर्थकारण यशस्वी करायचे असेल, तर समतोल साधावा लागतो. उपलब्ध माहिती, अर्थजगतातील घडामोडी, त्याचा संस्थेच्या व्यवसायावर होणारा परिणाम या सगळ्याचे आकलन महत्त्वाचे ठरते.

आपल्या सहजपणे हे लक्षात येते, की जून-जुलै महिन्यात आपल्या कोकणपट्ट्यात आंबा व्यावसायिक, बागायतदार यांच्याकडे चांगली आवक असते. त्या संधीचा लाभ घेण्यासाठी ठेववृद्धी मास असतो. दसरा-दिवाळी जुलैपासून साधारण तीन महिन्यांनी येते. हे मोठे सण असतात. त्यामुळे व्यापार-उद्योगात तेजी असते. नोकरदारांनाही बोनस वगैरे मिळण्याचे दिवस असतात. या काळात प्रामुख्याने शहरी भागांमध्ये मोठी अर्थवृद्धी होते. ही संधी साधली जाते. त्यानंतर परत तीन महिन्यांनी नववर्ष ठेव योजना असते. अशाच आधारावर स्वरूपानंद पतसंस्था राबवते आणि या योजनांना चांगले जनसमर्थन प्राप्त होते. जमा होणारी मोठी रक्कम या निश्चित कालावधीत जमा होत असल्याने वितरणासाठी नेमकी किती रक्कम उपलब्ध आहे, त्यानुसार वितरणाची व्यवस्था करता येते.

हे सगळे चक्र वरवर पाहता अत्यंत नेमस्त वाटते; पण प्रत्यक्षात यात खूप वर-खाली होत असते. या सगळ्याचा अंदाज घेऊन व्याजदर ठरवणे, ठेवींचे उद्दिष्ट ठरवणे हे पार पडत असते. घोषित केलेल्या व्याजदरांना ठेवीदारांची पसंती मिळणे महत्त्वाचे ठरते. घोषित केलेला व्याजदर ठेवीदारांच्या पसंतीला उतरणारा असावा, याला महत्त्व असते. त्यामुळे ठेव योजना जाहीर करणे सोपे असते; मात्र व्याजदर ठरवणे आणि उद्दिष्ट ठरवून ते पार करणे ही कसरत असते. अभ्यास पूर्ण लक्ष देऊन कसरत करण्याचे कसब आता अंगवळणी पडले आहे. त्यामुळे प्रत्येक योजनेला भरभरून प्रतिसाद मिळतो. सध्याच्या दसरा-दिवाळी ठेव योजनेलाही भरभरून प्रतिसाद मिळेल असा विश्वास आहे. दसरा-दिवाळीच्या चैतन्यमय उत्सवानिमित्ताने सर्वांचे अभीष्टचिंतन!



**- ॲड. दीपक पटवर्धन,**
संपादक, स्वरूप सहकार

**वर्ष : १, अंक : ६.** RNI No. MHMAR/25/A4199. ऑक्टोबर २०२६. *पाने १६. *किंमत ५ रुपये

'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा' या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक सिद्धिविनायक प्रिंटर्स, कारवांचीवाडी, रत्नागिरी' येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर. **मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स. **संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२. **संपर्क :** (०२३५२) २२१२६३/२९५३६३. **वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com

**Volume : 1, Issue : 6. October 2026**

This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Siddhivinayak Printers, Karwanchiwadi, Ratnagiri and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri – 415612. **Editor :** Adv. Deepak Manohar Patwardhan. **Executive Editor :** Aniket Konkar

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची दसरा-दिवाळी ठेव योजना

## ▸ आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर शाश्वत गुंतवणुकीचा भक्कम पर्याय

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने दर वर्षीप्रमाणेच यंदाही आपल्या गुंतवणूकदारांसाठी दसरा-दिवाळी ठेव योजना जाहीर केली आहे. जगात सर्वत्र आर्थिक अस्थिरतेचे वातावरण असताना स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने आपल्या सातत्यपूर्ण शिस्तबद्ध वाटचालीतून नेहमीप्रमाणेच शाश्वत गुंतवणुकीचा भक्कम पर्याय उपलब्ध करून दिला आहे. त्याचा लेखाजोखा मांडणारा हा संस्थाध्यक्षांचा लेख...**

आपण सध्या आर्थिक अस्थिरतेचा कालखंड अनुभवत आहोत. जगाच्या निरनिराळ्या भागांमध्ये चाललेली युद्धे, इंधनाचा तुटवडा, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची चमत्कारिक, बेभरवशी वृत्ती आणि धरसोडीचे टोकाचे निर्णय, प्रमुख राष्ट्रांमध्येही वाढलेला अर्थकारणाचा तणाव, भारतात क्रूड ऑइल पुरवठा आणि आयातीसाठी लागणारे मोठ्या प्रमाणावरील परकीय चलन, त्यामुळे परकीय चलनाच्या गंगाजळीवर आलेला दबाव, या सगळ्या बाबी कमी होत्या म्हणून की काय, पण यंदा अत्यल्प बरसलेला पाऊस... त्यामुळे दुष्काळाची काळी छाया अधिक गडद झाली. या सगळ्याचा परिणाम अर्थकारण अस्थिर होण्यात होत आहे. महागाई वाढण्यासाठी पूरक झालेले वातावरण, त्यात शेअर बाजार, म्युच्युअल फंड खात असलेल्या गटांगळ्या, सोन्याचा अतिरिक्त वाढत गेलेला दरही आता फार पुढे जाऊ इच्छित नाही, तिथल्या तिथे मागे-पुढे होऊन आपली चकाकी टिकवण्याची पराकाष्ठा करताना आपण पाहतो आहोत.

रिझर्व्ह बँकेने रुपयाच्या पडझडीला आधार देण्यासाठी वेळोवेळी अनेक उपाय केले. याच महिन्यात घेतलेल्या तिमाही आढावा बैठकीत रेपो रेट वाढवला गेला. आता आणखी काही दिवसांमध्ये बँकांचे दर पाव टक्का वाढतील. कर्जाचे दरही वाढतील. शेअर्स उसळी घेतात; मात्र अलीकडची वर नोंदलेली अस्थिरता, शेअर बाजाराची अस्थिरता लवकर संपेल असे वाटत नाही. सोन्यानेही बऱ्यापैकी उच्चतम पातळी गाठली आहे. आता अधिक जोरकस मुसंडी मारायला सोन्याला काही अवधी द्यावा लागेल. याचा अर्थ सध्या बँका, शेअर, म्युच्युअल फंड, सोन्याची बाजारपेठ ही सगळी साधने फार अस्थिर आहेत. त्यांच्या भरवश्यावर राहण्यासारखी स्थिती नाही.

### भक्कम स्थिती, आकर्षक व्याजदर

**स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने ४५५ कोटींच्या ठेवी, ३१७ कोटींचे कर्जवितरण, २०१ कोटीच्या बँक गुंतवणुका अशी भक्कम आर्थिक स्थिती घेऊन दसरा-दिवाळी ठेव योजना जाहीर केली आहे. संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये कमालीचे सातत्य असून, सुरक्षित गुंतवणुकीसाठी ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची ठरते. २८ टक्क्यांपर्यंत भांडवलपर्याप्तता, ठेवी-कर्जांचे ६३ टक्के आदर्श प्रमाण, एसएलआर गुंतवणुकीचे २५ टक्के प्रमाण, निर्माण केलेल्या अन्य निधीच्या १०० टक्के गुंतवणुकीसह सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ६० कोटींच्या घरातील स्वनिधी अशी आर्थिक आकडेवारी ठेवीदारांना सुरक्षिततेची हमी देते. या पार्श्वभूमीवर, ठेवीदारांनी गुंतवणूक करून स्वरूपानंद पतसंस्थेच्या स्वरूप अर्थ परिवारात सहभागी व्हावे आणि सुरक्षित व आकर्षक परताव्याचे लाभार्थी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.**

अशा स्थितीत दर वेळी आकर्षक व्याजदर देणाऱ्या, सर्वांना आपल्याशा वाटणाऱ्या स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या दसरा-दिवाळी ठेव योजनेत आपली गुंतवणूक करून आपण निर्धास्त होऊन आकर्षक व्याजदराचे लाभार्थी होऊ शकता. पतसंस्थेने आपल्या ठेवीदारांसाठी ८.२५ ते ८.७५ टक्के व्याजाच्या योजना घोषित केल्या आहेत.

अर्थकारणात कितीही अस्थिरता असली, तरीही स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने आपल्या संपूर्ण वाटचालीत अर्थकारणाचा बाज सांभाळत अत्यंत सातत्यपूर्ण वाढ केली आहे. अचानक उच्चांकी, अचानक मध्यम, अचानक न्यूनतम अशी अर्थगती अर्थसंस्थेत धोकादायक मानली जाते. हे सर्व टाळून स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने आपले व्यवहार सातत्याने वृद्धिंगत केले. केलेली वाढ प्रमाणबद्ध राहील, अंदाजित वाढ आणि प्रत्यक्ष वाढ यांचे प्रमाण तंतोतंत जुळते राहील हे संस्थेने कटाक्षाने पाळले. त्यामुळे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेकडे वाढत्या ठेवींचा विनियोग योग्य प्रमाणात होईल, यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत राहिली. वितरित झालेला पैसा नियमित वसूल करण्यासाठी योग्य जागरूकता सातत्याने पाळली गेली. याचा प्राप्त उत्पन्नावर सकारात्मक परिणाम झाला. त्यातून संस्थेचा स्वनिधी वृद्धिंगत होताना आपण अनुभवत आहोत. स्वनिधी ६० कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे. याचा अर्थ असा, की संस्थेला ६० कोटी रुपयांची रक्कम बिनव्याजी वापरता येत आहे. या सगळ्या शिस्तबद्धतेमुळे संस्थेचे अर्थकारण सदैव वृद्धिंगत होताना दिसते. त्याचबरोबर स्वामी

.... (पान ९ वर)

# स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

## ३० सप्टेंबर २०२६पर्यंतची आर्थिक स्थिती

**₹५४०.५३** कोटी रुपये

## खेळते भांडवल

**₹४५५.३१** कोटी रुपये

**ठेवी**

**₹३१७.४८** कोटी रुपये

**वितरित कर्जे**

**₹२०१.४१** कोटी रुपये

**गुंतवणूक**

**₹५९.३९** कोटी रुपये

**स्वनिधी**

**₹६.५८** कोटी रुपये

**निव्वळ नफा**

(१ एप्रिल २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीतील)

| वसुलीचे प्रमाण | सीडी रेशो | सीआरएआर | ऑडिट वर्ग |
|---|---|---|---|
| ९९.७९ टक्के | ६२.१८ टक्के | २९.०६ टक्के | ‘अ’ |

# पतसंस्थेची सातत्यपूर्ण वाढ दर्शवणारी कामगिरी

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने दर वर्षीप्रमाणे यंदाही गुंतवणूकदारांसाठी दसरा-दिवाळी ठेव योजना जाहीर केली आहे. ॲड. दीपक पटवर्धन यांच्या सक्षम नेतृत्वाखाली स्थापनेपासूनच संस्थेची वाटचाल शिस्तबद्ध, पारदर्शक पद्धतीने प्रगतिपथावर सुरू आहे. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीतील संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेणारा हा लेख गुंतवणूकदारांना गुंतवणुकीचा निर्णय घेण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरेल.**

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने आपली यशस्वी घोडदौड सातत्याने सुरू ठेवली आहे. १९९१ साली ३०० सभासद आणि अवघे १० हजार रुपये भागभांडवल घेऊन सुरू झालेली स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आजच्या घडीला ५० हजारांहून अधिक सभासदांचा परिवार बनली आहे. महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या पतसंस्थेच्या आज १७ शाखा आहेत. संस्थेकडील ठेवखात्यांची संख्या २५ हजारांहून अधिक झाली आहे. १९९१ साली सुरुवात झाली, त्या प्रारंभीच्या सात महिन्यांत संस्थेला ३५०० रुपयांचा तोटा झाला होता. त्यानंतर पतसंस्थेने सातत्याने नफ्याची नवनवी शिखरे गाठली. पहिला तोटा भरून काढून १९९२-९३ या आर्थिक वर्षात संस्थेने ५९५१ रुपयांचा निव्वळ नफा मिळवला. सुरुवातीच्या या छोट्या आकड्यांपासून आज कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारांपर्यंत पोहोचलेल्या पतसंस्थेची वाटचाल अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या सक्षम नेतृत्वाखाली सातत्यपूर्ण राहिली आहे. पारदर्शक व्यवहार, आर्थिक शिस्त आणि नियोजनबद्ध कामकाज ही संस्थेने सुरुवातीपासून कायम राखलेली कार्यपद्धती आहे.

पतसंस्थेला सलग ३४ वर्षे लेखापरीक्षणात 'अ' वर्ग मिळाला आहे. ३० सप्टेंबर २०२६अखेर पतसंस्थेचा संमिश्र व्यवसाय म्हणजे ठेवी आणि वितरित कर्जे यांची बेरीज ७७२.७९ कोटी रुपये झाली आहे. महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या या संस्थेच्या १७ शाखा आहेत. संस्थेकडील ठेवखात्यांची संख्या २५ हजारांहून अधिक झाली आहे. या विस्ताराची आर्थिक बाजू समजून घेण्यासाठी गेल्या पाच पूर्ण आर्थिक वर्षांची आणि चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांची आकडेवारी पाहणे उपयुक्त ठरेल. दसरा-दिवाळी ठेव योजनेच्या निमित्ताने गुंतवणूकदारांना संस्थेच्या वाढीचा वेग आणि त्या वाढीमागील कार्यपद्धती समजून घेता येईल.

## ठेवींमध्ये सातत्याने वाढ

२०२१-२२मध्ये संस्थेच्या ठेवी २५०.३१ कोटी रुपये होत्या. पुढील वर्षी त्या २६५.०७ कोटी रुपये झाल्या. २०२३-२४मध्ये ठेवींनी ३०० कोटींचा टप्पा ओलांडला आणि त्या ३०८.८० कोटी रुपये झाल्या. २०२४-२५मध्ये त्या ३४६.२१ कोटी रुपयांवर गेल्या आणि २०२५-२६ अखेर ठेवी ४०८.८८ कोटी रुपये झाल्या. ठेवींचा आलेख कायम वाढता असून, पाच वर्षांत ठेवींमध्ये १५८.५७ कोटी रुपयांची भर पडली आहे. ही वाढ ६३.३५ टक्के आहे.

ठेवी वाढत जात असताना त्यांचा योग्य विनियोग करण्याची पतसंस्थेची क्षमता वाढवणेही आवश्यक असते. ठेववृद्धीची गरज लक्षात घेऊन उद्दिष्टे आणि व्याजदर ठरवले जातात. वाढत्या ठेवींच्या योग्य विनियोगासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असते. त्यामुळे ठेवींच्या वाढीकडे पाहताना त्यासोबत कर्जे, गुंतवणूक आणि वसुलीतील बदलही समजून घ्यावे लागतात.

## कर्जव्यवसायाचा विस्तार

२०२१-२२मध्ये पतसंस्थेने १७०.५१ कोटी रुपयांची कर्जे वितरित केली. २०२२-२३मध्ये १८२.०१ कोटी रुपये, तर २०२३-२४मध्ये २१५.१० कोटी रुपयांची कर्जे संस्थेने दिली. पुढे २०२४-२५मध्ये २५२.६४ कोटी आणि २०२५-२६मध्ये ३०२.६५ कोटी रुपये असा कर्जव्यवसायाचा विस्तार झाला. पाच वर्षांचा विार करता वितरित कर्जांमध्ये १३२.१४ कोटी रुपयांची म्हणजे ७७.५० टक्के वाढ झाली आहे. यावरून ठेवींतील वाढीसोबत कर्जव्यवसायही विस्तारल्याचे दिसते. ठेवी आणि वितरित कर्जे यांची बेरीज म्हणजे संमिश्र व्यवसाय २०२१-२२मध्ये ४२०.८२ कोटी रुपये होता. तो २०२५-२६मध्ये ७११.५३ कोटी रुपये झाला. संमिश्र व्यवसायातील ही वाढ २९०.७१ कोटी रुपयांची म्हणजे सुमारे ६९.०८ टक्के आहे.

## कर्जवसुलीतील सातत्य

कर्जव्यवसाय वाढताना वितरित कर्जांची नियमित वसुली होणे संस्थेच्या उत्पन्नासाठी महत्त्वाचे असते. संस्थेच्या कर्जवसुलीचे प्रमाण सुरुवातीपासूनच उत्तम असून, पाच वर्षांच्या आकडेवारीतूनही हे दिसून येते. २०२१-२२मध्ये कर्जवसुलीचे प्रमाण ९९.५१ टक्के होते. २०२२-२३मध्ये ९९.६१ टक्के, २०२३-२४मध्ये ९९.५३ टक्के, २०२४-२५मध्ये ९९.७१ टक्के, तर २०२५-२६मध्ये ते ९९.८३ टक्के एवढे होते. यावरून असे लक्षात येते, की कर्जवसुलीचे प्रमाण कायमच ९९.५० टक्क्यांपेक्षा अधिक राहिले आहे. या कालावधीत वितरित कर्जे १७०.५१ कोटी

# स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

## पाच वर्षांची तुलनात्मक आर्थिक स्थिती

(२०२१-२२ ते २०२५-२६)

| | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी | २५०.३१ | २६५.०७ | ३०८.८० | ३४६.२१ | ४०८.८८ |
| खेळते भांडवल | २९६.९७ | ३२०.८७ | ३७६.६८ | ४१५.२० | ४८८.६३ |
| कर्जे | १७०.५१ | १८२.०१ | २१५.१० | २५२.६४ | ३०२.६५ |
| गुंतवणूक | ११९.६१ | १३१.०६ | १५०.६८ | १४९.३३ | १६९.२९ |
| स्वनिधी | ३१.८५ | ३६.८४ | ४२.४२ | ४८.१३ | ५४.६४ |
| निव्वळ नफा | ६.२१ | ६.६१ | ७.०३ | ८.३२ | १०.९४ |
| वसुलीचे प्रमाण (टक्के) | ९९.५१ | ९९.६१ | ९९.५३ | ९९.७१ | ९९.८३ |
| सी.डी. रेशो (टक्के) | ५९.४७ | ५८.१५ | ५९.९६ | ६३.६६ | ६५.०१ |
| सीआरएआर (टक्के) | २७.१९ | २८.०२ | २७.९७ | २८.२० | २९.०६ |
| ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ |

रुपयांवरून ३०२.६५ कोटी रुपये झाली, त्याच वेळी वसुलीचे उच्च प्रमाण टिकले, हे महत्त्वाचे आहे. वितरित कर्जांच्या नियमित वसुलीसाठी सातत्याने जागरूक राहण्याच्या कार्यपद्धतीमुळे हे शक्य झाले आहे.

## गुंतवणूक आणि खेळते भांडवल

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने केलेली गुंतवणूक २०२१-२२मध्ये ११९.६९ कोटी रुपये होती. ती २०२२-२३मध्ये १३१.०६ कोटी, तर २०२३-२४मध्ये १५०.६८ कोटी रुपये झाली. २०२४-२५मध्ये गुंतवणूक किंचित कमी होऊन १४९.३३ कोटी रुपये झाली असली, तरी त्यापुढील वर्षी ती पुन्हा वाढून १६९.२९ कोटी रुपये झाली. या पाच वर्षांच्या कालावधीतील गुंतवणुकीतील एकूण वाढ ४९.६० कोटी रुपये म्हणजे ४१.४४ टक्के आहे.

संस्थेचे खेळते भांडवलही या कालावधीत वाढले. २०२१-२२मध्ये ते २९६.९७ कोटी रुपये होते. ते पुढील वर्षांमध्ये अनुक्रमे ३२०.८७ कोटी, ३७६.६८ कोटी, ४१५.२० कोटी आणि ४८८.६३ कोटी रुपये झाले. पाच वर्षांतील ही वाढ १९१.६६ कोटी रुपये म्हणजे ६४.५४ टक्के आहे. ठेवी, कर्जे आणि गुंतवणुकीसोबत संस्थेच्या एकूण आर्थिक आकारात झालेला विस्तार या आकड्यांतून स्पष्ट होतो.

## नफ्यात सातत्याने वाढ

संस्थेने १९९३मध्ये मिळवलेल्या ५९५१ रुपयांच्या पहिल्या निव्वळ नफ्यापासून सुरू झालेला प्रवास कायमच प्रगतिपथावर राहिला आहे. गेल्या पाच वर्षांचा विचार करता २०२१-२२मध्ये निव्वळ नफा ६.२१ कोटी रुपये होता. त्यापुढील वर्षी तो ६.६१ कोटी रुपये, तर २०२३-२४मध्ये ७.०३ कोटी रुपये झाला. २०२४-२५मध्ये नफा ८.३२ कोटी रुपये, तर २०२५-२६मध्ये तो १०.९४ कोटी रुपयांवर पोहोचला. या पाच वर्षांच्या कालावधीत निव्वळ नफ्यात ४.७३ कोटी रुपयांची, म्हणजे ७६.१७ टक्के वाढ झाली. व्यवहारांच्या विस्तारासोबत निव्वळ नफ्यात झालेली वाढ संस्थेच्या प्रगतीचा महत्त्वाचा भाग आहे. ॲड. पटवर्धन यांनी संस्थेच्या खर्चावर, विशेषतः प्रशासकीय खर्चावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला आहे. नियमित वसुली आणि नियंत्रित खर्च यांचा उत्पन्नावर सकारात्मक परिणाम होतो,



अशी संस्थेची भूमिका आहे. बँकांच्या तुलनेत आकर्षक ठेवदर देणे या कार्यपद्धतीमुळे शक्य होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. संस्थेचे उत्पन्न वाढवताना त्याचा लाभ ठेवीदारांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न आहे.

## वाढत्या स्वनिधीचा आधार

व्यवसायवाढीबरोबर संस्थेच्या स्वतःच्या निधीतही सातत्याने वाढ झाली आहे. २०२१-२२मध्ये स्वनिधी ३१.८५ कोटी रुपये होता. २०२२-२३मध्ये तो ३६.८४ कोटी, २०२३-२४मध्ये ४२.४२ कोटी, २०२४-२५मध्ये ४८.१३ कोटी आणि २०२५-२६मध्ये ५४.६४ कोटी रुपये झाला. या पाच वर्षांच्या कालावधीत २२.७९ कोटी रुपयांची म्हणजे ७१.५५ टक्के वाढ झाली. स्वनिधीच्या वाढीचा दर खेळत्या भांडवलाच्या एकूण वाढीच्या दरापेक्षा अधिक राहिला. यामुळे वाढत्या व्यवसायासोबत संस्थेच्या स्वतःच्या निधीचा आधारही विस्तारला आहे. स्वतःच्या निधीचा बिनव्याजी वापर करता येणे संस्थेच्या अर्थकारणासाठी महत्त्वाचे आहे. सप्टेंबर २०२६अखेर हा निधी ६० कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे.

## लेखापरीक्षण आणि आर्थिक गुणोत्तरे

लेखापरीक्षणात सलग ३४ वर्षे मिळालेला ‘अ’ वर्ग ही संस्थेच्या दीर्घकालीन उत्तम आणि सातत्यपूर्ण वाटचालीची महत्त्वाची नोंद आहे. संस्थेचा सीडी रेशो अर्थात कर्जांचे ठेवींशी प्रमाणही चांगले आहे. सीडी रेशो २०२१-२२मध्ये ५९.४७ टक्के होता. पुढील वर्षांत तो अनुक्रमे ५८.१५ टक्के, ५९.९६ टक्के, ६३.६६ टक्के आणि ६५.०१ टक्के असा आहे. भांडवलपर्याप्तता दर्शवणारा सीआरएआर २०२२-२३मध्ये २७.१९ टक्के, २०२३-२४मध्ये २८.०२ टक्के, २०२४-२५मध्ये २७.९७ टक्के आणि २०२५-२६मध्ये २८.२० टक्के आहे. हे गुणोत्तर तुलनेने स्थिर राहिल्याचे दिसते.

## चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीतील वाटचाल

२०२६-२७ अर्थात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांतही संस्थेचा व्यवसाय वाढला आहे. ३१ मार्च २०२६अखेरच्या ४०८.८८ कोटी रुपयांच्या ठेवी ३० सप्टेंबर २०२६ अखेर ४५५.३१ कोटी रुपये झाल्या. सहा महिन्यांत ४६.४३ कोटी रुपयांची म्हणजे ११.३६ टक्के वाढ झाली. कर्जे ३०२.६५ कोटी रुपयांवरून ३१७.४८ कोटी रुपये झाली. ही वाढ १४.८३ कोटी रुपये म्हणजे ४.९० टक्के आहे. याच काळात गुंतवणूक १६९.२९ कोटी रुपयांवरून २०१.४१ कोटी रुपये झाली. सहामाहीतील वाढ ३२.१२ कोटी रुपये म्हणजे १८.९७ टक्के आहे. खेळते भांडवल ४८८.६३ कोटी रुपयांवरून ५४०.५३ कोटी रुपये झाले. ही वाढ ५१.९० कोटी रुपयांची म्हणजे १०.६२ टक्के आहे. स्वनिधी ५४.६४ कोटींवरून ५९.३९ कोटी रुपये झाला. सहा महिन्यांतील ही वाढ ८.६९ टक्के आहे. सप्टेंबरअखेर वसुलीचे प्रमाण ९९.७९ टक्के असून, मार्चअखेरच्या तुलनेत किरकोळ बदलासह उच्च पातळी कायम आहे. सीडी रेशो ६२.१८ टक्के आणि सीआरएआर २९.०६ टक्के आहे. पहिल्या सहामाहीचा निव्वळ नफा ६.५८ कोटी रुपये आहे. ॲड. पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने जपलेली नियोजनबद्ध वाढ, ठेवींचा योग्य विनियोग आणि खर्चावरील नियंत्रण यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन गुंतवणूकदारांनी यंदाच्या दसरा-दिवाळी ठेव योजनेत गुंतवणूक करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

**- अनिकेत कोनकर**

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची दसरा-दिवाळी ठेव योजना

(पान ४ वरून)....

स्वरूपानंद पतसंस्थेने आपल्या खर्चावर प्रचंड नियंत्रण ठेवले असल्याने, प्रशासकीय खर्चाचे प्रमाण नियंत्रणात ठेवल्याने ठेवींवर बँकांपेक्षा अधिक व्याज देणे पतसंस्थेला सहजपणे साध्य झाले.

मुळात बँकांच्या तुलनेत दोन टक्क्यांपर्यंत अधिकचे व्याजदर देणे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला परवडते. कारण बँकांपेक्षा खूप नियंत्रणात असलेला प्रशासकीय खर्च. त्यामुळे स्वरूपानंद पतसंस्थेला असणारी ठेववृद्धीची गरज लक्षात घेऊन त्यानुसार ठेवींचे उद्दिष्ट ठरवून व्याजदर ठरवले जातात. त्यामुळे संस्थेच्या उत्तम आर्थिक स्थितीचा लाभ गुंतवणुकीला सहज प्राप्त होतो.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेकडे असलेल्या ठेवखात्यांची संख्या २५ हजारांची संख्या ओलांडून पुढे गेली आहे.

## दसरा-दिवाळी ठेव योजना

### ११ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर २०२६

१. **स्वरूपांजली ठेव योजना** – १२ ते १८ महिने
सर्वसाधारण गुंतवणूकदारांसाठी व्याजदर - ८.२५ टक्के
ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी व्याजदर - ८.५० टक्के

२. **सोहम ठेव योजना** – १९ ते ३६ महिने (मासिक व्याज)
सर्वसाधारण - ८.५० टक्के
**ज्येष्ठ नागरिक व महिला** – ८.७५ टक्के

३. एकरकमी १० लाख रुपये व त्यावरील ठेवींसाठी व्याजदर - ८.७५ टक्के

सभासदांच्या संख्येनेही ५० हजारांचा टप्पा पार केला आहे. ५० हजारांपेक्षा अधिक जनता स्वरूपानंद पतसंस्थेशी संलग्न असणे ही गोष्ट संस्थेसाठी, तसेच प्रत्येक सभासदासाठी अभिमानाची आहे.

पतसंस्थेच्या कामगिरीतील सातत्य, आकर्षक व्याजदरांचे गमक काय हे आपल्यापुढे मांडण्यासाठी हा लेखप्रपंच. दसरा-दिवाळी ठेव योजनेत गुंतवणूकदारांनी अधिक विश्वासाने मोठी गुंतवणूक करावी, असे विनम्र आवाहन, याद्वारे करत आहे.

- अॅड. दीपक पटवर्धन

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरुख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली पारदर्शक, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध वाटचाल

सलग
३४ वर्षे
लेखापरीक्षणात
'अ' वर्ग

**१९९१**
संस्थेची स्थापना
३०० सभासद
₹१० हजार भागभांडवल
प्रारंभीच्या सात महिन्यांत
₹३,५०० तोटा

**१९९३**
नफ्याची सुरुवात
प्रारंभीचा तोटा भरून काढत
₹५,९५१ निव्वळ नफा

**२०२५-२६**
**₹१०.९४ कोटी**
निव्वळ नफा

## आजचा विस्तार

**५० हजारांहून अधिक**
सभासद

**२५ हजारांहून अधिक**
ठेवखाती

**१७**
शाखा

**₹७७२.७९ कोटी**
संमिश्र व्यवसाय
३० सप्टेंबर २०२६ अखेर
ठेवी ₹४५५.३१ कोटी + कर्ज ₹३१७.४८ कोटी

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

# आकर्षक व्याजदर देणे संस्थेला कसे शक्य होते?

**१ गरजेनुसार ठेव उभारणी**

आर्थिक परिस्थिती व कर्जमागणीचा अभ्यास त्यानुसार ठेव उद्दिष्टे आणि व्याजदर.

**२ निधीचा योग्य विनियोग**

कर्जवितरण व बँक गुंतवणुकीचे नियोजन.

**३ नियमित कर्जवसुली**

वितरित निधीच्या वसुलीसाठी सातत्याने पाठपुरावा.

**वसुली ९९.७९%**

३० सप्टेंबर २०२६अखेर

**४ खर्चावर नियंत्रण**

निधी उभारणीचा व प्रशासकीय खर्च नियंत्रणात.

**५ वाढत्या स्वनिधीचा आधार**

संस्थेच्या स्वतःच्या निधीचा आर्थिक आधार.

**स्वनिधी ₹५९.३९ कोटी**

३० सप्टेंबर २०२६अखेर

आर्थिक शिस्त आणि नियोजनातून

## ठेवीदारांना आकर्षक व्याजदर

## दसरा–दिवाळी ठेव योजना

११ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर २०२६

**स्वरूपांजली**

१२ ते १८ महिने

| | |
|---|---|
| सर्वसाधारण | ८.२५% |
| ज्येष्ठ नागरिक व महिला | ८.५०% |

**सोहम**

१९ ते ३६ महिने

मासिक व्याज

| | |
|---|---|
| सर्वसाधारण | ८.५०% |
| ज्येष्ठ नागरिक व महिला | ८.७५% |

**एकरकमी ₹१० लाख** व त्यावरील ठेवींना **८.७५%** व्याजदर


वाहन खरेदी कर्ज
प्रति लाख हप्ता
२११३/-*
(मुदत ५ वर्ष)
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com


२० मिनिटांत उपलब्ध!
जलद, सुलभ, किफायतशीर
सोनेतारण कर्ज
मर्यादा १ कोटी पर्यंत
अल्प व्याजदर *
ऐवजाचे जास्तीतजास्त व्हॅल्युएशन
तुमच्या ऐवजाची संपूर्ण सुरक्षितता
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com




# पतसंस्था चळवळीसमोरील कायदेविषयक प्रश्न आणि भविष्याची दिशा

**महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनतर्फे आयोजित करण्यात आलेला दोन दिवसांचा राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम रत्नागिरीत मोठ्या उत्साहात पार पडला. यामध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतील विविध संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या फेडरेशनचे, तसेच स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी या वेळी केलेल्या भाषणात पतसंस्था चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले मुद्दे मांडले. त्या भाषणाचा हा संपादित अंश...**

पतसंस्था चळवळीच्या दृष्टीने कायद्यात होणारे बदल अत्यंत महत्त्वाचे आहेत. अशा प्रत्येक बदलाचा बारकाईने अभ्यास करून त्याचे संस्थांच्या दैनंदिन कामकाजावर होणारे परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बदलते कायदे, नवीन तंत्रज्ञान आणि पतसंस्थांच्या व्यवहाराशी संबंधित विषयांचे योग्य प्रशिक्षण देण्यासाठी सुनियोजित अभ्यासक्रम तयार करण्याचीही आवश्यकता आहे.

### प्रशिक्षणासाठी स्वतंत्र अभ्यासक्रमाची गरज

पतसंस्था चळवळीतील प्रशिक्षण अधिक परिणामकारक करायचे असेल तर त्यासाठी चांगला अभ्यासक्रम तयार करणे गरजेचे आहे. प्रशिक्षणामध्ये मांडल्या जाणाऱ्या विषयांचे महत्त्व योग्य प्रकारे समजून घेता यावे आणि त्या विषयांना खऱ्या अर्थाने न्याय देता यावा, यासाठी नियोजनबद्ध अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतो. अशा प्रकारचा अभ्यासक्रम तयार करून तो संपूर्ण महाराष्ट्रातील पतसंस्थांपर्यंत पोहोचवण्याची आवश्यकता आहे. त्याचा उपयोग संपूर्ण पतसंस्था चळवळीला होऊ शकतो.

### नाममात्र सभासद आणि सोनेतारण कर्ज

'कलम १४४-११ अ'मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार नाममात्र सभासदत्व देऊन सोनेतारण कर्ज वितरित करता येईल. वरवर पाहता पतसंस्थांसाठी ही सोयीची बाब वाटू शकते; मात्र या बदलाचा विचार आदर्श पोटनियम आणि कायद्यातील अन्य तरतुदींच्या संदर्भातही करावा लागेल.

या कायदेबदलाची प्रक्रिया ज्या पद्धतीने झाली, त्याबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होतो. अधिवेशनाच्या अंतिम टप्प्यात संबंधित विधेयक अवघ्या दहा मिनिटांत मंजूर झाल्याचे समजले. अशा प्रकारचा पतसंस्था चळवळीवर परिणाम करणारा कायदेबदल करताना कायद्यानुसार राज्य पतसंस्था फेडरेशनशी अर्थपूर्ण चर्चा करणे आवश्यक होते; मात्र अशी चर्चा करण्यात आली नाही. असे असताना इतक्या कमी वेळेत विधेयक मंजूर होणे योग्य नाही. पतसंस्था चळवळीशी संबंधित कायदे करताना त्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फेडरेशनशी चर्चा करून त्याची बाजू समजून घेणे आवश्यक आहे.

आदर्श पोटनियमांमध्ये नाममात्र सभासदाची संकल्पना समाविष्ट नाही. नाममात्र सभासदाला कोणते अधिकार द्यायचे असतील, तर ते पोटनियमांमध्ये नमूद करणे आवश्यक असते. त्यामुळे एका बाजूला कायद्यात नाममात्र सभासदाला सोनेतारण कर्ज देण्याची तरतूद आणि दुसऱ्या बाजूला आदर्श पोटनियमांमध्ये नाममात्र सभासदाची संकल्पनाच नसणे, या दोन्ही बाबींचा एकत्रित विचार होणे आवश्यक आहे.

आजपर्यंत पतसंस्था नियमित सभासद करून सोनेतारण कर्ज देत आहेत. सोनेतारण कर्ज तात्काळ उपलब्ध होणे आवश्यक असल्यामुळे नियमित सभासदत्व देण्याची प्रक्रिया अडचणीची ठरते, अशी भूमिका मांडली जाते; मात्र संचालक मंडळाला आपले अधिकार वापरता येतात. तातडीचे सभासदत्व देण्याचा अधिकार अध्यक्ष, शाखा व्यवस्थापक किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला देण्याचा ठराव संचालक मंडळ करू शकते.

अशा व्यक्तीने आवश्यक पूर्तता करून सभासदत्व दिल्यानंतर त्या सभासदांची यादी पुढील व्यवस्थापन समितीच्या बैठकीत मंजूर करून घेता येऊ शकते. त्यामुळे तातडीने सभासदत्व देण्याची व्यवस्थाही करता येते.

### बचत खाते आणि ठेवींचा प्रश्न

सोनेतारण कर्ज देताना संबंधित कर्जदाराचे बचत खाते उघडले जाते. कर्जाची रक्कम त्या खात्यावर वर्ग करून पुढे आरटीजीएस, रोख किंवा अन्य माध्यमातून वितरित केली जाते; मात्र नाममात्र सभासदाचे कोणत्याही प्रकारचे डिपॉझिट स्वीकारता येणार नाही, अशी तरतूद कायद्यात आहे. आदर्श पोटनियमांतील डिपॉझिटच्या व्याख्येमध्ये बचत ठेवीचाही समावेश होतो. त्यामुळे नाममात्र सभासदाचे बचत खाते उघडले, तरी ते डिपॉझिट ठरते. एका बाजूला नाममात्र सभासदाचे डिपॉझिट स्वीकारू नये आणि दुसऱ्या बाजूला त्याला सोनेतारण कर्ज देता यावे, अशा दोन्ही तरतुदींचा एकत्रित विचार केला असता विसंगती निर्माण होते.

गोल्ड लोनच्या बाबतीत आणखी एक व्यावहारिक प्रश्न निर्माण होऊ शकतो. एखाद्या कर्जदाराच्या तारणातील सोन्याचा लिलाव केल्यानंतर कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम प्राप्त झाली, तर सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार ती अतिरिक्त रक्कम त्याच्या बचत खात्यात जमा केली जाते. नाममात्र सभासदाचे बचत खातेच उघडता येत नसेल, तर अशी अतिरिक्त रक्कम अनामत खात्यात ठेवावी लागेल. त्यामुळे अनामत खात्यांच्या रिकन्सिलिएशनची अतिरिक्त जबाबदारी संस्थेवर येऊ शकते.

### आयकराच्या दृष्टीनेही विचार आवश्यक

नाममात्र सभासदांबरोबरच्या व्यवहाराच्या संदर्भात आयकराच्या काही तरतुदीही लागू होतात. या संदर्भात दोन्ही बाजूच्या अथॉरिटीज आहेत. काही ठिकाणी नाममात्र सभासदाचा विषय डायल्यूट करण्यात आला आहे, तर काही

प्रकरणांमध्ये नाममात्र सभासदाबरोबर व्यवहार झाल्यास 80P ची सवलत मिळत नाही, अशा प्रकारच्या अथॉरिटीजही आहेत. त्यामुळे नाममात्र सभासदाला सोनेतारण कर्ज देण्याच्या तरतुदीचा विचार करताना भविष्यात संस्थेवर होऊ शकणाऱ्या आयकरविषयक परिणामांचाही विचार करणे आवश्यक आहे.

या दुरुस्तीचा फेरविचार होणे गरजेचे आहे. नाममात्र सभासदाची संकल्पना वापरायची असेल, तर आदर्श पोटनियमांमध्ये आवश्यक दुरुस्ती करून नाममात्र सभासदांच्या डिपॉझिटसंदर्भातही स्पष्ट तरतूद होणे आवश्यक आहे. त्यानंतरच या सर्व बाबींचा समावेश असलेली सर्वकष व्यवस्था अंमलबजावणीसाठी आणली पाहिजे.

### ‘May’मुळे संस्थांना उपलब्ध असलेला पर्याय

या कायदेबदलातील एक महत्त्वाची बाब म्हणजे संबंधित तरतुदीत ‘May’ (मे) हा शब्द वापरण्यात आला आहे. ‘Shall’ (शॅल) असा शब्द वापरण्यात आलेला नाही. त्यामुळे संस्थेला योग्य वाटत असेल तर नाममात्र सभासदाला कर्ज देता येईल आणि तसे करणे योग्य वाटत नसेल, तर नियमित कर्जदार सभासद करून कर्ज वितरित करण्याचा पर्यायही उपलब्ध राहतो. त्यामुळे कायद्यातील अशा प्रत्येक दुरुस्तीचा पतसंस्था चळवळीतील संबंधितांनी सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.

### अद्ययावत कायद्याचा अभ्यास आवश्यक

कायद्यात दुरुस्ती झाल्यानंतर सुमारे १५ दिवसांत त्याची अद्ययावत पुस्तके उपलब्ध होतात. एकदा घेतलेल्या जुन्या पुस्तकाच्या आधारे पुढील व्यवहार करणे योग्य नाही. कायद्यातील प्रत्येक बदलानंतर अद्ययावत पुस्तक संस्थेच्या दफ्तरी असणे आवश्यक आहे. कायद्याची मूळ इंग्रजी पुस्तके वापरणे उपयुक्त ठरते. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये इंग्रजी ड्राफ्टिंग ग्राह्य मानले जात असल्यामुळे मूळ स्वरूपातील कायद्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

### अंशदानाचा प्रश्न

पतसंस्था चळवळीसमोरील आणखी एक महत्त्वाचा विषय म्हणजे अंशदान. अंशदानातून संस्थांच्या ठेवींचे संरक्षण नेमके कशा पद्धतीने होणार, त्यासाठी आवश्यक यंत्रणा कोणती आणि ती कितपत सक्षम आहे, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. केवळ अंशदान स्वीकारून ठेवींचे संरक्षण कसे केले जाणार, याचे स्पष्ट उत्तर मिळणे आवश्यक आहे. या फंडामध्ये शासनाकडून १०० कोटी रुपये जमा केले जाणार होते; मात्र ते अद्याप जमा झालेले नाहीत.

या विषयासंदर्भात न्यायालयीन प्रक्रियाही सुरू आहे. संबंधित यंत्रणा नीटनेटकी होत नाही आणि ठेवींचे संरक्षण कशा पद्धतीने होईल याची खात्री मिळत नाही, तोपर्यंत अंशदानाच्या प्रश्नावर पतसंस्था चळवळीने सजग राहणे आवश्यक आहे. १९ हजार संस्थांपैकी केवळ १०० ते १५० संस्थांनी सुमारे दोन कोटी रुपयांचे अंशदान भरले आहे. त्यामुळे या विषयाला पतसंस्था चळवळीचा पाठिंबा नाही, हे स्पष्ट होते.

### पतसंस्थांसाठी सक्षम क्रेडिट इन्फॉर्मेशन व्यवस्था

पतसंस्थांसाठी क्रेडिट इन्फॉर्मेशनची सक्षम व्यवस्था असणेही अत्यंत आवश्यक आहे. सध्या ‘क्रास’ प्रणालीचा उपयोग अनेक संस्था करतात; मात्र तिचा वापर एकतर्फी होत असल्याचे दिसते. सिबिल पाहण्यासाठी या प्रणालीचा उपयोग केला जातो; पण प्रत्येक संस्थेची माहिती त्या प्रणालीला दिली जात नाही. त्यामुळे सर्व पतसंस्थांच्या माहितीचे एकत्रित संकलन होत नाही.

नवीन कायद्याप्रमाणे सभासदाची संमती घेतल्याशिवाय अशा पद्धतीची माहिती ट्रान्सफर करता येत नाही. त्याचबरोबर क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनीज रेग्युलेशन ॲक्ट २००५ मध्ये पतसंस्थांचा समावेश नाही. या कायद्यात ‘क्रेडिट इन्स्टिट्यूशन’ असा क्लॉज आहे. या क्लॉजमध्ये पतसंस्थांचा समावेश होईपर्यंत सिबिलसारख्या कंपन्यांचे सभासदत्व पतसंस्थांना मिळू शकणार नाही. क्रेडिट इन्स्टिट्यूशन म्हणून मान्यता मिळत नाही, तोपर्यंत कर्जदार आणि सभासदांचा डेटा अन्य कंपनीला वर्ग करण्यासही अडचणी आहेत. महाराष्ट्रातील १९ हजार पतसंस्था आणि देशातील अन्य पतसंस्थांना क्रेडिट इन्स्टिट्यूशन म्हणून मान्यता मिळाल्यास अशा क्रेडिट इन्फॉर्मेशन प्रणालींचा अधिक प्रभावीपणे उपयोग करता येईल.

पतसंस्थांच्या माध्यमातून राज्यात एक लाख चोवीस हजार कोटी रुपयांचा कर्जपुरवठा झालेला आहे. त्यामुळे कर्जदाराची आर्थिक स्थिती समजून घेताना केवळ बँकांकडील त्याची कर्जविषयक माहिती पुरेशी ठरत नाही. सर्व पतसंस्थांची माहिती एका प्रणालीवर उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे कर्जपुरवठा अधिक सुरक्षित पद्धतीने करता येऊ शकतो.

### फेडरेशनची आर्थिक ताकद वाढवण्याची गरज

पतसंस्था फेडरेशनची आर्थिक ताकद वाढवण्यासाठी महाराष्ट्र सहकार कायद्याच्या कलम ११० अंतर्गत फेडरेशनला नोटिफिकेशन मिळण्याची आवश्यकता आहे. शासनाच्या माहितीनुसार, दर वर्षी सुमारे ५०० संस्था लिक्विडेशनमध्ये जातात. पतसंस्था फेडरेशनला नोटिफाय केल्यास लिक्विडेशनमध्ये जाणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता आणि रिझर्व्ह फंडासंदर्भातील कायदेशीर तरतुदींचा उपयोग फेडरेशनच्या आर्थिक बळकटीसाठी होऊ शकतो. फेडरेशनची आर्थिक ताकद वाढल्यास पतसंस्थांचे प्रश्न हाताळणे, प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे आणि अन्य सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देणे शक्य होईल.

### बदलत्या काळात युवा सहभाग आवश्यक

कायदेशीर आणि आर्थिक प्रश्नांबरोबरच पतसंस्था चळवळीच्या भवितव्याचाही विचार करणे आवश्यक आहे. युवा वर्गाला पतसंस्थांकडे आकृष्ट करणे ही काळाची गरज आहे. ‘जेन झी’चा जमाना असताना पतसंस्था चळवळीनेही डिजिटल बदल आत्मसात करणे आवश्यक आहे.

रोजच्या व्यवहारामध्ये आधुनिक आणि डिजिटल माध्यमांचा उपयोग कसा करता येईल आणि त्याद्वारे नवतरुण वर्गाला पतसंस्था चळवळीशी कसे जोडता येईल, याचा विचार झाला पाहिजे. चळवळीचे भवितव्य तरुणांच्या हातात असल्यामुळे युवकांचा सहभाग अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे. प्रत्येक संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रातील किमान १० युवकांना दर महिन्याला संस्थेशी जोडण्याचा संकल्प केला आणि युवकांसाठी नवीन योजना तयार केल्या, तर युवा वर्गाला पतसंस्था चळवळीशी जोडता येईल.

पतसंस्था चळवळ गेली शंभर वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत आहे. अत्यंत स्पर्धेच्या युगातही ही चळवळ प्रभावीपणे काम करत आहे. यापुढील काळात ही चळवळ अधिक विश्वासार्ह, अधिक पारदर्शक, अधिक उपयुक्त आणि अधिक शिस्तप्रिय करण्यासाठी प्रत्येक घटकाने सजगपणे काम करणे आवश्यक आहे. ■













महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनतर्फे आयोजित करण्यात आलेला दोन दिवसांचा राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली रत्नागिरीत मोठ्या उत्साहात पार पडला. यामध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतील विविध संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. फेडरेशनचे महासचिव श्री. राजोबा, उपाध्यक्ष डॉ. शिंगी, माजी अध्यक्ष काकासाहेब कोयटे, मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. लवांदे, विभागीय फेडरेशनचे संतोष थेराडे, सिंधुदुर्ग पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. राऊळ, डीसीसी बँकेचे संचालक सचिन भिंगार्डे यांच्यासह अनेक मान्यवर या वेळी उपस्थित होते. रत्नागिरी जिल्हा उपनिबंधक राम कुलकर्णी यांनी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन केले. (ॲड. दीपक पटवर्धन यांचे भाषण वाचा पान क्रमांक १३ वर)



राज्यातील मोठ्या पतसंस्थांचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींनी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला भेट दिली. गोदावरी अर्बनचे श्री. तांबेकर, छत्रपती संभाजीराजे पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. लेंभे, धन्वंतरी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. भोसले आणि शिवकृपा पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. चव्हाण यांच्याशी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी विचारविनिमय केला.






**दसरा-दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा**

आमच्या विश्वासार्ह व आकर्षक ठेवयोजनांमध्ये गुंतवणूक करुन निश्चिंत व्हा !
ॲड. दीपक पटवर्धन (अध्यक्ष)

# स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था

**मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य**

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
मो. नं. 9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com